MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

● वर्ष : १९ अंक : ५ पाने : ८ ● ऑगस्ट-सप्टेंबर २०२४ www.mahatransco.in ● Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान व आधुनिकीकरणावर भर देणे गरजेचे आहे. महापारेषणसारख्या पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपनीस आधुनिकीकरणावर काम करण्यास खूप संधी आहे. सर्वतोपरी विचार केला असता असे दिसते की, महापारेषणच्या पायाभूत सुविधांमध्ये (उपकेंद्र, तारमार्ग) फार मोठा टप्पा गाठण्यास कंपनीस यश आले आहे. यापुढे त्यामध्ये आधुनिकीकरण आणण्याचे आव्हान कंपनीसमोर आहे. विशेषतः ऑनलाईन, डिजिटल पध्दतीचा अवलंब सातत्याने केला पाहिजे. तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (AI) जास्तीत-जास्त वापरावर भर दिला पाहिजे.

- **आधुनिकीकरणावर भर द्यावा**
- **कामांचा आढावा घ्या**
- **वेळेत प्रकल्प पूर्ण करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

स्क्रॅप मोजणी व विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महापारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळाने एक पाऊल पुढे टाकले आहे, हे कौतुकास्पद आहे. महापारेषण कंपनीच्या इतिहासात प्रथमच वाशी परिमंडळाने ६० मेट्रिक टन क्षमता असलेल्या अत्याधुनिक डिजिटल वजनकाट्याची उभारणी केली आहे. कळवा संकुलात असलेल्या व सर्वत्र विखुरलेल्या जुन्या एम.एस., जीआय सामानाचे, कंडक्टरचे वजन करुन स्क्रॅपिंग प्रस्ताव तयार करणे फार अडचणीचे होते. तसेच अति उच्च दाब वाहिन्यांचे जुने कंडक्टर बदलण्याचे काम कळवा मंडल अंतर्गत प्रगतिपथावर आहे. या जुन्या कंडक्टरचे बाहेरील वजन काटयाचे वजन पुनर्तपासणीकरिता देखील अडचणी येत होत्या. मात्र, त्यावर आता महापारेषणने मात केली आहे.

या वजन काटयामुळे स्क्रॅप मोजणी व विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, कळवा संकुलात असलेल्या जुन्या एमएस, जीआय सामानाचे, कंडक्टरचे अचूक वजन करुन त्याची योग्य भावात विक्री करणे, स्क्रॅपिंगची वेगवान प्रक्रिया राबविणे तसेच वजन करताना बाहेरील हस्तक्षेप टाळणे व एकूणच कंपनीच्या महसुलात वाढ करण्याचे ध्येय यामुळे साध्य करणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर जुनी झालेली महापारेषण यंत्रणा त्यास अद्ययावत करण्याचे सुध्दा प्रयत्न युध्दपातळीवर सुरु आहेत. मला आशा आहे की, पुढील काही वर्षात आधुनिकीकरणाचा फार चांगला टप्पा पार पाडण्यास आपण यशस्वी होऊ.

मुंबई शहर व उपनगराच्या वीजमागणीत सातत्याने वाढ होत असताना त्या मागणीस पूरक असणा-या महापारेषणच्या ४०० के. व्ही. कळवा-पडघा वाहिनी क्र. १ चे सध्याचे जुने कंडक्टर बदलून त्याऐवजी नवीन उच्च क्षमतेचे कंडक्टर (HPC) लावण्याचे महत्त्वाकांक्षी काम महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवघ्या १७ दिवसांत पूर्ण केले आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. यामुळे वाहिनी क्र. १ आणि वाहिनी क्र. २ या दोन्ही वाहिन्या मिळून २००० मेगावॅटऐवजी ४ हजार २०० मेगावॅट इतक्या विजेचे आता वहन करणे शक्य होणार आहे.

महापारेषणच्या १००/२२ के.व्ही. नोसील उपकेंद्रातील २३ फिडर एआयएस ते जीआयएसमध्ये रूपांतरित करण्याचे काम महापारेषणच्या अभियंत्यांनी विक्रमी वेळेत पूर्ण केले आहे. यामुळे नवी मुंबई परिसरातील औद्योगिक, वाणिज्य तसेच अत्यावश्यक सेवा ग्राहकांना आता योग्य दाबाने विद्युत पुरवठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यात वाढणारी विजेची मागणी पूर्ण करणे तसेच सुयोग्य दाबाने वीजपुरवठा करणे महापारेषणला शक्य होणार आहे.

कंपनीने नियोजित केलेले प्रकल्प वेळेत व नियोजित खर्चात पूर्ण करणे सर्व प्रकल्प अभियंत्यांची जबाबदारी आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यात आपल्यासारख्या पायाभूत सुविधा देणाऱ्या कंपनीस अनेक अडचणी येणार, हे साहजिकच आहे. मात्र, त्या अडचणींवर मात करण्याचेच कौशल्य आपल्या अभियंत्यांकडे असणे गरजेचे आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ते मार्गदर्शन करून आपला अनुभव आपल्या



**डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

चमूस देणे गरजेचे आहे. प्रकल्पांमध्ये आऊट ऑफ बॉक्स विचार तसेच सर्जनशीलतेचा (Creativity) वापर करून प्रकल्पातील अडचणींवर मात करावी लागते. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांचे विषय, अडचणी, आव्हाने वेगवेगळी असतात. त्यांना मात करण्यासाठी उपाययोजनासुध्दा स्थानिक पातळीवर शोधावी लागते. प्रकल्पांमध्ये त्यामुळे आपल्याला प्रत्येक समस्या वेगवेगळ्या माध्यमातून बघणे गरजेचे राहते.

संचलन व सुव्यवस्थेमध्ये नियोजनाचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कंपनीने ठरवून दिलेल्या नियोजनात्मक कामाच्या अंमलबजावणीमुळे संचलन व सुव्यवस्था उत्तम पध्दतीने राखण्यास मदत होते. कोणत्याही पध्दतीचा व्यत्यय व अनियमितता आपल्याला अनेक अडचणींना आमंत्रण देऊ शकते. त्यासाठी प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याने नियमबध्द आढावा घेऊन नियोजनात्मक कामे पार पाडतील, याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**मुंबई :** उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाची माहिती देणाऱ्या 'परिवर्तनाचा नायक' या पुस्तकाचे प्रकाशन मुंबईत उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुस्तकाचे लेखक व एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. श्रीकर परदेशी, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा व श्रीमती नीता केळकर.

### राज्यामध्ये ऊर्जा क्षेत्रात व्यापक सुधारणा

# 'परिवर्तनाचा नायक' पुस्तकाचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन

Follow us on :

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाची माहिती देणाऱ्या 'परिवर्तनाचा नायक' या पुस्तकाचे प्रकाशन मुंबईत उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

यावेळी पुस्तकाचे लेखक व एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. श्रीकर परदेशी, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा व श्रीमती नीता केळकर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या ऊर्जामंत्रीपदाच्या अवघ्या सव्वा दोन वर्षांच्या काळात राज्यामध्ये ऊर्जा क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्यात आल्या. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी ९००० मेगावॅटच्या सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली. हा जगातील सर्वात मोठा डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प आहे. त्यासोबत नविनीकरणीय ऊर्जेचा वापर करण्यास चालना देणारी अनेक पावले टाकण्यात आली. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्सची करण्यासाठी आवश्यक ऊर्जा सज्जता निर्माण करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठीही महत्त्वाचे प्रकल्प राबविण्यात आले.

शेतकऱ्यांसह सर्वसामान्य वीज ग्राहकांना दिलासा मिळण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले. उपमुख्यमत्री श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वात अत्यंत कमी कालावधीत राज्यात ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन झाले व त्याचा लाभ राज्याला आगामी काळात होत राहणार आहे, याविषयीची माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco @maha_transco MahaTransco
MahaTransco Mahatranscoltd MahaTransco



**ऐरोली :** महापारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळाने ६० मेट्रिक टन क्षमता असलेल्या अत्याधुनिक डिजिटल वजनकाट्याची उभारणी केली आहे. याप्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, कळवा मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे, कार्यकारी अभियंता श्री. संतोष भुजबळ, श्री. मोहन ननवरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. परेश पवार.

### ▶ ६० मेट्रिक टन क्षमतेचा अत्याधुनिक डिजिटल वजन काटा

# महापारेषणच्या इतिहासातील पहिला वजनकाटा कळवा संकुलात

Follow us on :

स्क्रॅप मोजणी व विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महापारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळाने एक पाऊल पुढे टाकले आहे. महापारेषण कंपनीच्या इतिहासात प्रथमच वाशी परिमंडळाने ६० मेट्रिक टन क्षमता असलेल्या अत्याधुनिक डिजिटल वजनकाट्याची उभारणी केली आहे.

कळवा संकुलात असलेल्या व सर्वत्र विखुरलेल्या जुन्या एम.एस., जीआय सामानाचे, कंडक्टरचे वजन करुन स्क्रॅपिंग प्रस्ताव तयार करणे फार अडचणीचे होते. तसेच अति उच्च दाब वाहिन्यांचे जुने कंडक्टर बदलण्याचे काम कळवा मंडल अंतर्गत प्रगतिपथावर आहे. या जुन्या कंडक्टरचे बाहेरील वजन काटयाचे वजन पुनर्तपासणीकरिता देखील अडचणी येत होत्या. त्यामुळे येथे महापारेषणचा स्वतःचा वजन काटा प्रस्थापित करण्याची गरज होती.

या वजन काटयामुळे स्क्रॅप मोजणी व विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, कळवा संकुलात असलेल्या जुन्या एमएस, जीआय सामानाचे, कंडक्टरचे अचूक वजन करुन त्याची योग्य भावात विक्री करणे, स्क्रॅपिंगची वेगवान प्रक्रिया राबविणे तसेच वजन करताना बाहेरील हस्तक्षेप टाळणे व एकूणच कंपनीच्या महसुलात वाढ करण्याचे ध्येय यामुळे साध्य करणे शक्य होणार आहे.

महापारेषण कंपनीच्या इतिहासात प्रथमच ६० मेट्रिक टन क्षमता असलेल्या अत्याधुनिक डिजिटल वजन काटा बसविण्यात आला आहे. या वजन काट्याच्या उभारणीसाठी संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण व वाशी परिमंडळ मुख्य अभियंता श्री. महेश भागवत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच कळवा मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे यांच्या प्रयत्नाने आणि कार्यकारी अभियंता श्री. संतोष भुजबळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. परेश पवार यांच्या देखरेखीखाली या वजनकाट्याची यशस्वीरित्या उभारणी करण्यात आली. सदर कामात मेसर्स. टेक इन्फिनिटीचे श्री. महेश शिंदे यांचेही मोलाचे योगदान लाभले.

### ▶ नोसील उपकेंद्रातील फिडर एआयएस ते जीआयएसमध्ये रूपांतरित

# नवी मुंबईतील अत्यावश्यक सेवांना मिळणार योग्य दाबाने वीज

Follow us on :

महापारेषणच्या १००/२२ के.व्ही. नोसील उपकेंद्रातील २३ फिडर एआयएस ते जीआयएसमध्ये रूपांतरित करण्याचे काम महापारेषणच्या अभियंत्यांनी विक्रमी वेळेत पूर्ण केले आहे. यामुळे नवी मुंबई परिसरातील औद्योगिक, वाणिज्य तसेच अत्यावश्यक सेवा ग्राहकांना आता योग्य दाबाने विद्युत पुरवठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यात वाढणारी विजेची मागणी पूर्ण करणे तसेच सुयोग्य दाबाने वीजपुरवठा करणे महापारेषणला शक्य होणार आहे.

महापारेषणच्या १००/२२ के.व्ही. नोसील उपकेंद्र १९६७ साली कार्यान्वित झाले आहे. या केंद्रातून नवी मुंबई परिसरातील औद्योगिक, वाणिज्य तसेच अत्यावश्यक सेवा ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्यात येतो. या उपकेंद्रात १०० के.व्ही. चे ६ आणि २२ के.व्ही. चे १७ असे एकूण २३ फिडर आहेत. हे फिडर अत्यंत कमी जागेमध्ये बसविण्यात आले आहेत. त्यामुळे त्याची देखभाल करण्यात अडचण येत होती. तसेच एखादे उपकरण निकामी झाल्यास बाजूच्या उपकरणांची हानी होत होती. याबरोबरच काम करत असताना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. यासोबतच प्रतिदिन वाढत असलेला फिडरवरचा विजेचा वाढता भार अशा अनेक समस्या या उपकेंद्रात निर्माण झाल्या होत्या.

या समस्यांमुळे या एआयएस उपकेंद्रातील सर्व २२ के.व्ही. फिडर जीआयएस उपकेंद्रात रूपांतरित करण्याचा तसेच अतिरिक्त ५० एम.व्ही.ए. चे रोहित्र स्थापित करण्याचा निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत घेण्यात आला. त्यानुसार पुरेशी जागा उपलब्ध नसतानाही कमी जागेत जीआयएस फिडरचे काम कमीत-कमी वेळेत यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. त्यामुळे भविष्यात वाढणारी विजेची मागणी पूर्ण करणे तसेच सुयोग्य दाबाने वीजपुरवठा करणे महापारेषणला आता शक्य होणार आहे. या कामासाठी वाशी परिमंडळचे मुख्य अभियंता श्री.महेश भागवत, कळवा मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच भांडूप विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकुंद पवार, पीएसी विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. जयकुमार धोंगडे, १०० के.व्ही. नोसील उपकेंद्राचे उपकार्यकारी अभियंता श्री. सचिन बोलके यांनी कामाचे नियोजन व अंमलबजावणीकरिता मोलाची भूमिका पार पाडली. तसेच या कामासाठी मेसर्स. एस. के. इलेक्ट्रिकल यांचेही सहकार्य लाभले.



## विशेष लेख

**देशातील ऊर्जेच्या एकूण वापरांपैकी कृषी क्षेत्रासाठी सुमारे २२ टक्के वापर होतो. महाराष्ट्रात सुमारे ४५ लाख कृषी वीज ग्राहक असून ते विजेचा वापर हा मुख्यत: कृषी पंपासाठी करतात. शेतकऱ्यांना पूर्वी चक्रीय पध्दतीने दिवसा आणि रात्री वीजपुरवठा केला जात होता. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात सिंचन करताना अनेक अडचणींना सामना करावा लागत असे. यावर उपाय म्हणून शासनाने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' १४ जून २०१७ साली सुरू केली.**

# शेतीला सौर ऊर्जा, शेतकऱ्यांमध्ये चैतन्य

देशातील ऊर्जेच्या एकूण वापरांपैकी कृषी क्षेत्रासाठी सुमारे २२ टक्के वापर होतो. महाराष्ट्रात सुमारे ४५ लाख कृषी वीज ग्राहक असून ते विजेचा वापर हा मुख्यत: कृषी पंपासाठी करतात. शेतकऱ्यांना पूर्वी चक्रीय पध्दतीने दिवसा आणि रात्री वीजपुरवठा केला जात होता. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात सिंचन करताना अनेक अडचणींना सामना करावा लागत असे. यावर उपाय म्हणून शासनाने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' १४ जून २०१७ साली सुरू केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी या योजनेत आवश्कतेनुरूप बदलही करण्यात आले. तथापि, या योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव व आव्हाने पाहता या योजनेची अंमलबजावणी मिशन मोडवर करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी'चे सुधारित स्वरूप निश्चित करण्यासाठी महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनी, महाऊर्जा तसेच पीडब्ल्यूसी संस्था यांच्या प्रतिनिधींचा एक अभ्यासगट प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आला. या अभ्यासगटाने विविध शिफारसी आणि मिशन २०२५ संदर्भात प्रयास संस्थेचा अहवाल विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी तसेच कृषी फिडर्सचे सौर ऊर्जीकरण मिशन मोडमध्ये करण्याच्या दृष्टीने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना–2.0' हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला.

या अभियानामध्ये 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' अधिक सक्षम आणि सुव्यवस्थित करणे, सन २०२५ पर्यंत कृषी वीज वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक कार्यपध्दती आणि देखरेखीचा आराखडा तयार करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा अखंडित व शाश्वत वीजपुरवठा करणे आणि किमान सात हजार मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करणे, ही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

या अभियानांतर्गत विकेंद्रित प्रकल्प आस्थापित करण्यासाठी वीज उपकेंद्रांच्या परिघातील जमिनीची उपलब्धता, ग्रीड कनेक्टिव्हिटी आणि प्रकल्पाचे आकारमान हे महत्त्वाचे घटक आहेत. हे घटक परिस्थितीनुरूप बदलत असतात. यासाठी काही तरतुदींचा अवलंब करण्यात आला. जसे ०.५ ते १०



मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ११ के.व्ही./२२ के.व्ही. स्तरावर जोडणे, ५ ते २५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ३३ के.व्ही. स्तरावर जोडणे, ग्रीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध असल्यास उजनी, जायकवाडी व इतर जलाशयांवर व्यवहार्यतेच्या अधीन राहून १० ते ५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प ११ के.व्ही./ २२ के.व्ही./ ३३ के.व्ही. स्तरावर जोडणे, प्रकल्प समूह तयार करणे अशा विविध तरतुदींचा अवलंब करण्यात आला.

या अभियानासाठी पडीक जमिनीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी वीज उपकेंद्रापासून जवळच्या परिघातील खासगी जागा निश्चित करून सौर ऊर्जा प्रकल्पास उभारण्यास द्यावी, असे ठरविण्यात आले. यासाठी प्रकल्पासाठी शासकीय जमिनी नाममात्र रूपये एक या दराने ३० वर्षांच्या कालावधीकरिता भाडेपट्ट्याने आणि पोटभाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 अंतर्गत खासगी जमीन भाडेपट्ट्यावर घेताना त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किमतीच्या ६ टक्के दरानुसार परिगणित केलेला दर किंवा प्रतिवर्ष १ लाख २५ हजार रूपये प्रति हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दर म्हणून गृहित धरण्यात आला. अशा प्रकारे प्रथम वर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दरावर प्रत्येक वर्षी ३ टक्के सरळ पध्दतीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत प्रकल्पाची क्षमता कमी असल्यामुळे प्रकल्प आस्थापनेचा खर्च वाढतो व प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता कमी असते. तरीही कृषी क्षेत्रात सौर ऊर्जा उपलब्ध करून देण्याची गरज लक्षात घेता अशा प्रकल्पांना चालना देण्यासाठी विकासकांना प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य देण्याचे ठरले. तसेच या अभियानात भाग घेणाऱ्या विकासकांना नाबार्ड, इरेडा, सार्वजनिक बँकाकडून माफक दराने प्रकल्प निधी मिळण्यासाठी शासनाने आवश्यक ती मदत केली.

शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे अभियान हे महत्त्वाकांक्षी अभियान असल्याने नोडल एजन्सी, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती, स्वतंत्र यंत्रणा, महाऊर्जा, प्रकल्प विकासक, स्थानिक प्रशासन, शेतकरी यांचे एकत्रित प्रयत्न झाले. यासाठी उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. अभियानाची यशस्वी व जलदगतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली.

या अभियानाचे फायदे पाहता, या अभियानामुळे औद्योगिक व व्यावसायिक वीज ग्राहकांवर आकारण्यात येणारी क्रॉस सबसिडी कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांच्या वीज दरात कपात, राज्याच्या विविध जिल्ह्यात मोठी गुंतवणूक आणि ग्रामीण भागात पूर्णवेळ आणि अर्धवेळ रोजगार निर्मिती होत आहे. महावितरण व महापारेषण कंपनीची वितरण प्रणाली सुध्दा बळकट झाली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना योग्य त्या भाराने वीजपुरवठा होण्यास मदत झाली. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भाडेपट्ट्याने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना २५ वर्षाच्या कालावधीकरिता शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला आणि राहणीमानाचा दर्जा व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली. त्याचबरोबर सामाजिक फायदा सुध्दा झाला आहे.

**– संजय डी.ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी (ऊर्जा)

Mission-Transmission

▶ महापारेषण कंपनीव्दारे अतिरिक्त वीजपुरवठ्याची हमी

# मुंबईच्या ऊर्जावहन क्षमतेत लक्षणीय वाढ; ४ हजार २०० मेगावॅट इतक्या विजेचे वहन करणे शक्य

Follow us on :



मुंबई शहर व उपनगराच्या वीजमागणीत सातत्याने वाढ होत असताना त्या मागणीस पूरक असणा-या महापारेषणच्या ४०० के. व्ही. कळवा -पडघा वाहिनी क्र. १ चे सध्याचे जुने कंडक्टर बदलून त्याऐवजी नवीन उच्च क्षमतेचे कंडक्टर (HPC) लावण्याचे महत्त्वाकांक्षी काम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून (महापारेषण) अवघ्या १७ दिवसांत पूर्ण केले आहे. ५०० पेक्षा अधिक कुशल कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विक्रमी वेळेत नुकतेच हे काम पूर्ण झाले. यामुळे वाहिनी क्र. १ आणि वाहिनी क्र. २ या दोन्ही वाहिन्या मिळून २००० मेगावॅटऐवजी ४ हजार २०० मेगावॅट इतक्या विजेचे आता वहन करणे शक्य होणार आहे.

या वाहिनीचे यापूर्वीच २७ कि.मी. चे काम २०२३-२४ मध्ये पूर्ण झाले होते. उर्वरित २३ कि.मी. चे काम महापारेषणने युध्दपातळीवर पूर्ण करण्याचे नियोजन केले. या वाहिनीच्या कामात रेल्वे, हायवे व उच्च विद्युत वाहिन्यांचे क्रॉसिंग, डोंगराळ भाग, वनजमीन तसेच ठिकठिकाणी स्थानिक ग्रामस्थांचा विरोध यासारखी मोठी आव्हाने होती. परंतु, या सर्व अडचणींवर मात करून महापारेषणने या वाहिनीच्या कामात गतिशीलता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व विविध भागधारकांशी सकारात्मक सुसंवाद साधून २३ कि.मी. चे वरील काम तातडीने पूर्ण केले.

या कामामुळे ४०० के.व्ही. कळवा-पडघा वाहिनी क्रमांक-१ च्या क्षमतेत आमुलाग्र बदल होऊन पूर्वीच्या १००० मेगावॅटऐवजी २१०० मेगावॅटपर्यंत विजेचे वहन करणे शक्य होणार आहे. यापूर्वीही कळवा-पडघा वाहिनी क्रमांक-२ च्या क्षमतेत वाढ झाल्याने दोन्ही वाहिन्या मिळून २००० मेगावॅटऐवजी ४ हजार २०० मेगावॅट इतक्या विजेचे वहन करणे आता शक्य होणार आहे.

हे काम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण व वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या कामाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी कळवा मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे, कार्यकारी अभियंता श्री. संतोष भुजबळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. सुखदेव पनवार यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. तसेच यासाठी मेसर्स अपार इंडस्ट्रिज लिमिटेड यांचेही मोलाचे योगदान लाभले.

# कर्मचाऱ्यांच्या लेखा भविष्य निर्वाह निधी खाते पत्रिकेचे प्रकाशन

Follow us on :

मुंबई आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने व्याजदर ८.२५% घोषित केला आहे. त्याचा लाभ तिन्ही कंपनीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना होणार आहे.

वैयक्तिक लेखा खाते पत्रिका (PLA- SLIP) आर्थिक वर्ष २०२३-२०२४ भविष्य निर्वाह निधीच्या पोर्टलवर (CPF PORTAL) सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. नुकतेच या लेखा खाते पत्रिकेचे (PLA-SLIP) प्रकाशन म.रा.वि.मं. भविष्य निर्वाह निधी न्यासचे विश्वस्त तथा म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (लेखा) (प्रभारी) श्री. पंकज शर्मा यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी म.रा.वि.मं. भविष्य निर्वाह निधी न्यासचे सचिव तथा महापारेषणचे सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मंगेश खराटे, वरिष्ठ व्यवस्थापक श्रीमती कीर्ती कावरे, उपव्यवस्थापक श्री. रामनाथ साबळे, श्री. जावेद इनामदार, श्री. अजय शिंदे, उत्तम नाक्ती व श्रीमती तेजश्री सोनावले उपस्थित होते.





@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in




Happy Independence Day

## महापारेषणच्या कर्मचारी सेवा विनियम पुस्तिकेचे प्रकाशन

# महापारेषणमध्ये ७८ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अर्थात महापारेषणमध्ये ७८ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. महापारेषणच्या मानव संसाधन विभागामार्फत कर्मचारी सेवा विनियम या पुस्तिकेच्या व्दितीय आवृत्तीचे प्रकाशन डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. पीयूष शर्मा, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, उपमुख्य तपास अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, श्री. महेश आंबेकर यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.





मुंबई : महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीत ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.). दुसऱ्या छायाचित्रात ध्वजारोहणप्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग. तिसऱ्या छायाचित्रात महापारेषणच्या मानव संसाधन विभागामार्फत कर्मचारी सेवा विनियम या पुस्तिकेच्या व्दितीय आवृत्तीचे प्रकाशन करताना डॉ. संजीव कुमार. शेजारी श्री. सतीश चव्हाण, श्री. अविनाश निंबाळकर, श्रीमती तृप्ती मुधोळकर, श्री. सुगत गमरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी वर्ग.

## महापारेषणच्या शिरपेचात मानाचा तुरा



**मंगलोर (कर्नाटक) :** येथे पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती डॉ. कृष्णा भट यांच्या हस्ते तीन पारितोषिके देण्यात आली. पारितोषिके स्वीकारताना महापारेषणचे संचालक (मनुष्यबळ विकास) श्री. सुगत गमरे व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे. शेजारी अभिनेते आणि दिग्दर्शक रवीकिरण, `पीआरसीआय`च्या चिन्मयी प्रवीण, गीता शंकर, डॉ. ममता लाला व अन्य पदाधिकारी.

### ▶ सर्वोत्कृष्ट दैनंदिनी, दिनदर्शिका व पब्लिक सर्व्हिस ॲडव्हर्टायझमेंटचा पुरस्कार

# पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाची महापारेषणला तीन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

Follow us on :

पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती डॉ. कृष्णा भट यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट दैनंदिनी, दिनदर्शिका व पब्लिक सर्व्हिस ॲडव्हर्टायझमेंटचा पुरस्कार मिळाला. महापारेषणचे संचालक (मनुष्यबळ विकास) श्री. सुगत गमरे व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

मंगलोर येथील हॉटेल मोतीमहलमध्ये आयोजिलेल्या १८ व्या जागतिक संवाद परिषदेमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी अभिनेते व दिग्दर्शक रवीकिरण, `पीआरसीआय`चे अध्यक्ष एम. बी. जयराम, डॉ. ममता लाला, डॉ. गीता शंकर, चिन्मयी प्रवीण यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### जनसंपर्क विभाग अग्रेसर

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस) जनसंपर्क विभागाने महापारेषणची सकारात्मक भूमिका लोकांसमोर ठळकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.




संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.